**ठळक बातम्या**

- केंद्र सरकार देशातल्या गरीब जनतेचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या उपस्थितीत संपन्न/ देशाच्या विकासाचं नेतृत्व युवकांनी स्वीकारण्याचं उपराष्ट्रपतींचं आवाहन

- जालन्यात वाळूच्या ढिगाऱ्या खाली दबल्यानं ५ मजूरांचा तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात तारकर्ली इथं दोन पर्यटकांचा समुद्रात बुडून मृत्यू

**आणि**

- चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडचं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३५२ धावांचं आव्हान, इंग्लडनं उभारली स्पर्धेच्या इतिहासातली सर्वोच्च धावसंख्या

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार देशातल्या गरीब जनतेचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. शाह यांनी आज पुण्यात झालेल्या एका कार्यक्रमात प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत लाभार्थ्यांना स्वीकृती पत्रांचं वितरण केलं त्यावेळी ते बोलत होते. हे सरकार नागरिकांचं घरांचं स्वप्न पूर्ण करण्यासोबतच, त्यांना स्वयंपाकाचा गॅस  सौर उर्जेचाही पुरवठा करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमात शहा यांच्या हस्ते राज्यातल्या २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृती पत्र आणि १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याची रक्कम वितरित केली

गेली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारही उपस्थित होते.

**<><><><>**

सहकार क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचं तसंच २०२७ पर्यंत अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलीयन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचा संकल्प पूर्ण होऊ शकणार नाही असं केंद्रीय गृह तसंच सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. पुणे इथं जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात बोलत होते. सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधक सोसायटीचं देशातील पहिलं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात सुरू करण्यात येणार आहे, त्याचप्रमाणं देशभरातील सहकारी बँकांना सहकार्य करुन आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यात आल्याची माहिती त्यांनी या कार्यक्रमात दिली.

**<><><><>**

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यात गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची २७ वी बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, दादरा नगर हवेली आणि दीव दमणचे प्रशासक प्रफुल पटेल आणि या क्षेत्रातल्या राज्यांचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

**<><><><>**

विकसित भारतासाठी नव्या संधींचा उपयोग करत देशाच्या विकासाचं नेतृत्व युवकांनी स्वीकारणं आवश्यक असल्याचं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज व्यक्त केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ व्या दीक्षांत समारंभाला ते उपस्थित होते. देशात प्रचंड क्षमता असून पायाभूत सुविधा,

दळणवळण, इंटरनेट सुविधा, तंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रात करुन आपण पुढे जात असल्याचं ते म्हणाले. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते पी.एम.उषा मेरु योजने अंतर्गत मंजूर चार इमारतींचं दृकश्राव्य पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. या योजनेअंतर्गत विद्यापीठाला १०० कोटीं रूपयांचं अनुदान मंजूर झालं आहे. या कार्यक्रमापूर्वी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते नाट्यगृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.

**<><><><><>**

नवी दिल्लीत सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आज दुसऱ्या दिवशी वाचक आणि साहित्य रसिकांनी मोठी गर्दी केली होती. तालकटोरा स्टेडियमवर छत्रपती शिवाजी महाराज नगरी इथं भरलेल्या या संमेलनात आज विविध विषयांवर परिसंवाद रंगले.

'मराठी पाऊल पडते पुढे' , 'मनमोकळा संवाद - मराठीचा अमराठी संसार' या विषयांवरील परिसंवादांना रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभा मंडपात कृष्णात पाटोळे आणि संघानं 'लोकसाहित्य भूपाळी ते भैरवी' हा कार्यक्रम सादर केला. यशवंतराव चव्हाण सभामंडपात 'आनंदी गोपाळ' या कादंबरीवर परिचर्चा रंगली. 'बृहन्महाराष्ट्रातील मराठी माणसाचे जीवन आणि साहित्य' या विषयावर परिसंवाद पार पडला. 'राजकारणाचे मराठी साहित्यात उमटणारे प्रतिबिंब' या विषयावर पत्रकार जयदेव डोळे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. बहुभाषिक कविसंमेलनालाही श्रोत्यांनी दाद दिली. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी संमेलनस्थळी हजेरी लावली.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी माजी मंत्री अनिल भाईदास पाटील आणि माजी आमदार लहू कानडे यांची नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे

प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज ही घोषणा केली. अनिल पाटील यांच्यावर जळगाव, नंदुरबार आणि धुळे जिल्हा संघटनेच्या प्रभारी पदाची तर लहू कानडे यांच्यावर सामाजिक न्याय विभागाच्या प्रभारी पदाची जबाबदारी सोपवली आहे.

**<><><><><>**

१९ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचं आज छत्रपती संभाजीनगर इथं उद्घाटन झालं. त्यापूर्वी औरंगपुरा भागातून साहित्यदिंडी काढण्यात आली. पारंपरिक ढोल ताशाच्या निनादात आदिवासी नृत्यावर फेर धरलेल्या नागरिकांनी शहरवासियांचं लक्ष वेधून घेतलं. संमेलनाचे उद्घाटक कंवल भारती यांनी या संमेलनाला शुभेच्छा दिल्या. संमेलनाध्यक्ष अशोक राणा यांनी छत्रपती संभाजीनगरात भरलेल्या या संमेलाचं अध्यक्षपद भुषवतांना आनंद होत असल्याची भावना व्यक्त केली. आमखास मैदानावर मलिक अंबर साहित्य नगरीत भरलेल्या या संमेलनात भरगच्च कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यातल्या जाफराबाद तालुक्यातल्या पासोडी इथं आज पहाटेच्या सुमारास पाच मजुरांचा मृत्यू झाला. पासोडी रस्त्यावरच्या पुलाच्या बांधकामासाठी हे मजूर आले होते आणि पत्र्याची शेड करून राहत होते. अवैध वाळू वाहतुकीच्या टिप्पर चालकानं घाईनं टिप्पर रिकामा करताना झोपलेल्या मजुरांना पाहिलं नाही, आणि त्यांच्यावर वाळू ओतली. त्यामुळे ही दुर्दैवी  घटना घडली. वाळूच्या ढिगाऱ्याखालून गावकऱ्यांनी एका लहान मुलीला सुखरूप  बाहेर काढलं असल्याचं वृत्त आहे. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीनं जेसीबीच्या सहायानं वाळू बाजूला घेतली. त्यानंतर मृतदेह पुढच्या तपासणीसाठी पाठवले असून या प्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जालन्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिली.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात तारकर्ली इथं दोन पर्यटकांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. तर एकाची प्रकृती गंभीर आहे. त्याच्यावर मालवण ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुण्याहून आलेले हे तीन जण आज सकाळी तारकर्ली समुद्रात पोहण्यासाठी उतरले होते. त्यांना बचाव पथकानं बाहेर काढून रुग्णालयात दाखल केलं.

<><><><><>

चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आज ब गटात ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात लाहोर इथं सुरु असलेल्या या सामन्यात इंग्लंडनं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३५२ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियान नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करताना केवळ ४३ धावांतच फिल सॉल्ट आणि जॅमी स्मिथ यांना माघारी धाडलं. मात्र त्यानंतर मात्र शतकवीर डकेट आणि अर्धशतकवीर रुट यांनी तिसऱ्या गड्यासाठी १५८ धावांची भागिदारी केल्यानं, इंग्लंडनं निर्धारीत ५० षटकांत ८ बाद ३५१ धावा केल्या. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातली ही आजवरची सर्वोच्च धावसंख्या आहे. इंग्लंडच्या वतीनं डकेट यानं सर्वाधिक १६५, तर रुट यानं ६८ धावा केल्या.

<><><><><>

पुणे ओपन चॅलेंजर टेनिस स्पर्धेत भारताच्या जीवन नेदुंचेझियन आणि विजय सुंदर प्रशांत या जोडीनं पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. त्यांनी ऑस्ट्रेलियाच्या ब्लेक बायल्डन आणि मॅथ्यू ख्रिस्तोफर रोमियोस यांचा ३-६, ६-३, १०-० असा पराभव केला. अंतिम फेरीच्या सामन्यात भारतीय जोडीची सुरुवात संथ झाली. त्यामुळे त्यांनी पहिला सेट ३-६ असा गमावला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ कार्यक्रमात देश-विदेशातल्या जनतेशी आपले विचार मांडणार आहेत. दर महिन्यात शेवटच्या

रविवारी प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा ११९ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, NEWS ON AIR वेबसाईट आणि मोबाईल ॲप वर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे. याशिवाय आकाशवाणी न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवर थेट प्रक्षेपण केलं जाईल. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचा मराठी अनुवाद आकाशवाणीवरुन प्रसारित होईल.

<><><><>

देशामध्ये संविधानाने राजकीय समानता आणली असली तरी सामाजिक आणि आर्थिक समानता येणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. वाशिम इथं विधी सेवा आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती, वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभागांतील सदस्य उपस्थित होते. यावेळी जिल्हा प्रशासनातल्या विविध विभागामार्फत योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र धनादेशांचं वाटप करण्यात आलं.

<><><><>

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मधून सिंधुदुर्ग जिल्ह्यातली ९ हजार ९६७ घरकुलं मंजूर झाली आहेत. मे महिन्यापर्यंत लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यासाठी सुक्ष्म नियोजन करून सर्व यंत्रणांनी समन्वय साधत काम पूर्ण करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी दिले.

<><><><>

जळगाव जिल्ह्यात तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत वाघूर उपसा सिंचन योजना प्रगतीपथावर असून या योजनांचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केलं. क्षेत्र ओलिता खाली

आणणं, शेततळी बांधणं आदी कामं या योजनांच्या माध्यमातून सुरु असून सध्या ९० टक्के पाइपलाइनचं काम पूर्ण झालं आहे. उर्वरित कामं लवकरच पूर्ण केली जाणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

पालघरमधल्या ग्रामस्थांना जबरदस्तीनं वेठबिगारी करायला भाग पाडल्याबद्दल गुजरातमधल्या वीटभट्टी मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वडखडकोना-गुरवपाडा गावातल्या पीडितांना नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान जबरदस्तीनं वेठबिगार करण्यात आलं असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य-महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे, तर विदर्भातही हवामान कोरडं राहणार आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. तर कोकणात काही ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाल्याची नोंद आहे.

राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथं १२ पूर्णांक दोन अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं आहे.

//<><><><><>//